
# मराठी ग्रामीण कादंबरीची कलारुपे

प्रा.(डॉ.) एकनाथ आळवेकर



# मराठी ग्रामीण कादंबरीची कलारूपे

प्रा. (डॉ.) एकनाथ आळवेकर

हर्मिस
प्रकाशन

हर्मिस
प्रकाशन

ISBN : 978-93-85565-61-8

Marathi Gramin Kadambarichi Kalarupe : Ekanath Alwekar

₹ 160/-

प्रकाशक-मुद्रक :
: हर्मिस प्रकाशन : ए-१७/१०४, मंगल भैरव,
नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे ४११ ०६८.

© एकनाथ आळवेकर

**पहिली आवृत्ती** १ मे २०२३ (महाराष्ट्र दिन)
**मुखपृष्ठ** मोतीराम पौळ

संशोधनदृष्टी विकसित
करणाऱ्या स्रोतांना..

## अनुक्रम

लेखकाचे मनोगत : ५
प्रस्तावना : डॉ. पंडित टापरे । ७
'गावठाण'मधील कोल्हापुरी बोली । १०
रौंदाळा : खेड्यातील राजकारणाचे वास्तव । १५
कापूसकाळ : कापूस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा । २०
झड-झिंबड : पाऊस आणि माणसांतील ताणतणाव । २६
लोहारो वानरो देस : आदर्शवादाच्या पराभवाचे चित्रण । ३३
धूळमाती : प्रामाणिक कुळाचा पराभव । ४०
'झुलीच्या खाली' अडकलेल्या माणुसकीचे चित्रण । ४८
जोहार : खणखणीत भूमिका मांडणारी कादंबरी । ५५
चारीमेरा : कृषी माहात्म्य मांडणारी कादंबरी । ६१
'झेलझपाट'मधील आदिवासी समाजवास्तव । ६६
'रथ' व 'चक्रव्यूह' या कादंबऱ्यांतील स्त्री-चित्रण । ६९
गिरिजा कीर यांची कादंबरी आणि स्त्री-पात्रे । ७५
नदीष्ट : वेदनेच्या प्रवाहाला सोबत नेणारी कादंबरी । ८४
चैत : आधुनिकतेबरोबर परंपरेत रमलेल्या गावाचे चित्रण । ९१
पाऊसकाळ : अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त गावाचे चित्रण । ९९

लेखक परिचय : १०२

## लेखकाचे मनोगत

'मराठी ग्रामीण कादंबरीची कलारूपे' हे समीक्षापर पुस्तक प्रकाशित होत असताना आपल्या हातून काही लेखनसेवा झाली, याचा आनंद होत आहे. या पुस्तकातील काही लेख नवीन कादंबरी हाती पडल्यानंतर आतुरतेने वाचून त्यावर प्रतिक्रिया स्वरूपात लिहावे, या भूमिकेतून लिहिले. नंतर लेखांचे पुनर्लेखन केले. काही लेख नियतकालिकांना पाठविले आणि ते प्रसिद्ध झाले.

यात समाविष्ट बहुतांश कादंबऱ्या २००० सालानंतरच्या आहेत. 'रथ,' 'चक्रव्यूह,' 'झेलझपाट,' आणि गिरीजा कीर यांच्या कादंबऱ्या २००० सालापूर्वीच्या आहेत. कृष्णात खोत यांच्या चारही कादंबऱ्यांवर लेखन करताना कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा परिसरातील भौगोलिक परिस्थिती, समाजजीवन आणि कोल्हापुरी बोलीची वैशिष्ट्ये मांडता आली. 'गावठाण' या कादंबरीमधील शेतकऱ्याच्या मुलीच्या आयुष्याचा झालेला खेळखंडोबा, 'रौंदाळा'मधील राजकारणात व्यस्त झालेलं खेडं, 'झड-झिंबड'मधील महापुरात बुडालेल्या गावाची दयनीय अवस्था, तर 'धूळमाती'मधून शेती कसणाऱ्या कुळाची अवहेलना कशी होते, याचे चित्रण आले आहे. या सर्वच कादंबऱ्या ग्रामीण जीवनाच्या तळाचा वेध घेणाऱ्या आहेत.

डॉ. प्रल्हाद कुलकर्णी यांची 'लोहारो वानरो देस' ही रूपांतरित कादंबरी चिंतनशील आहे. सुरेंद्र पाटील यांच्या 'झुलीच्या खाली' या कादंबरीत डायरी स्वरूपातील लेखन आहे. 'जोहार'मधून सुशील धसकटे यांनी एक विशिष्ट भूमिका घेऊन लिहिले आहे. सदानंद देशमुख यांच्या 'चारीमेरा' कादंबरीतील शेती वाचवण्यातील सकारात्मकता आढळते. मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' मधून रेखाटलेले आदिवासी समाजजीवन, रंगनाथ पठारे यांनी 'रथ' आणि 'चक्रव्यूह'मधून केलेले सोशिक स्त्रीचे चित्रण आणि गिरीजा कीर यांनी आपल्या कादंबऱ्यांतून मध्यमवर्गीय स्त्रीची पारंपरिक आणि आधुनिकतेचा समन्वय साधण्याची मानसिकता चित्रित केली आहे. 'नदीष्ट' या मनोज बोरगावकरांच्या कादंबरीतून नदीशी एकनिष्ठ

झालेला नायक पाहायला मिळतो. 'पाऊसकाळ' या विजय जाधव यांनी लिहिलेल्या कादंबरीतून अतिवृष्टीमुळे अगतिक झालेला माणूस आढळतो, तर 'चैत' ही द. तु. पाटील यांची कादंबरी अस्सल ग्रामीण जीवनानुभव मांडणारी आहे.

या पुस्तकासाठी गुरूवर्य डॉ. पंडित टापरे यांनी प्रस्तावनापर 'दोन शब्द' लिहायचे मान्य केल्याने माझ्या समीक्षा-लेखनाला पाठबळ मिळाले, याबद्दल मी सदैव त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. पुस्तकातील लेखांना पूर्वप्रसिद्धी देणाऱ्या सर्व संपादकांचे मन:पूर्वक आभार.

लेखन, वाचन आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणारे श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्राचार्य डॉ. अशोक करांडे, प्राचार्य डॉ. बी. जी. दुधाळे, डॉ. डी. ए. देसाई, प्रा. ता. रा. भोसले यांचा मी आभारी आहे. तसेच डॉ. राजन गवस, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, कृष्णात खोत यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. तसेच श्री. कौस्तुभ गावडे (सीईओ), प्रा. अजित पाचोरे, डॉ. डी. टी. पाटील, श्री. बाळकृष्ण कमळकर, प्रा. भाऊसाहेब गोसावी यांचे सहकार्य मिळाले, त्याबद्दल त्यांचे आभार.

हर्मिस प्रकाशनाच्या वतीने हे पुस्तक प्रसिद्ध होत आहे, त्यामुळे हर्मिसच्या संचालिका प्रिया धसकटे यांचेही आभार. हे पुस्तक मराठी ग्रामीण कादंबरीचे अभ्यासक, संशोधक यांना उपयुक्त ठरावे, अशी अपेक्षा.

**– डॉ. एकनाथ आळवेकर**
कोल्हापूर

# प्रस्तावना

प्रा. (डॉ.) एकनाथ आळवेकर हे नव्या पिढीतील समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीच्या अंगाने लेखन करणारे समीक्षक आहेत. त्यांच्या या लेखसंग्रहात एकूण पंधरा लेख आहेत. ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, सीमावर्ती साहित्य व महानगरी साहित्य अशा विविध प्रवाहांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या कादंबऱ्या आहेत.

यातल्या बहुतांश कादंबऱ्या या ग्रामीण व आदिवासी जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. शोषक व शोषित हा झगडा अनादी काळापासून चालू आहे. साहित्यकृतीचा भूगोल जरी वेगळा असला तरी शोषक-शोषितांच्या रूपाखालील संघर्ष मात्र समान आहे.

मधुकर वाकोडे, रंगनाथ पठारे, सदानंद देशमुखांसारखे ज्येष्ठ कादंबरीकार जसे येथे भेटतात; तसेच सुशील धसकटे, डॉ. प्रल्हाद कुलकर्णी, मनोज बोरगांवकर, द. तु. पाटील यांसारखे नवे कादंबरीकारही येथे भेटतात.

प्रा. आळवेकरांनी कृष्णात खोत यांच्या 'गावठाण', 'रौंदाळा', 'झड-झिंबड' व 'धूळमाती' या चार कादंबऱ्यांवर लिहिले आहे. 'गावठाण'ची ग्रामजीवनातील परस्परसंबंध, शेतीतील कष्टमय जीवन, अन्याय, आक्रमकता, तसेच क्षमाशील उदारवृत्ती ही वैशिष्ट्ये त्यांनी प्रत्ययकारीपणे उलगडून दाखवली आहेत. 'रौंदाळा'मध्ये बदलत्या खेड्यात राजकारण हे सांस्कृतिक जीवनाच्या अग्रभागी आलेले असले तरी विध्वंसकवृत्ती विधायकवृत्तीवर मात करताना दिसते आहे. 'झड-झिंबड'मध्ये पाऊस हा सूत्रधार आहे. तो सारे ग्रामीण जीवन ढवळून काढतो. मानवता, संवेदनक्षमता, मायाळूपणा यांचे उत्कट दर्शन येथे घडते. 'धूळमाती'मध्ये काळाच्या ओघात निसर्ग बदलला तशी माणसेही बदलली. दादा गुंडगुळ्याचा माळ सोडावा लागणार म्हणून दुःखी जरूर होतात, पण

कृतज्ञतेने धूळमाती कपाळाला लावतात. तर दाजी त्या शेताकडे क्रयवस्तू म्हणून पाहतो. हे नाट्य प्रा. आळवेकर यांनी नेमके टिपले आहे.

श्री. मधुकर वाकोडे यांच्या 'झेलझपाट' या कादंबरीत आदिवासींच्या जीवनातील रूढिप्रियता, अज्ञान, त्यांच्या विकासातले अडथळे, शिकलेल्या नायकाचे आदिवासींच्या उद्धाराचे प्रयत्न, यांचे दर्शन घडते.

श्री. रंगनाथ पठारे यांनी 'रथ' व 'चक्रव्यूह' या कादंबऱ्यांतून ग्रामीण, तसेच शहरी जीवनातील स्त्रीचे तटस्थपणे चित्रण केलेले आहे. या नायिका दुःखाच्या, शोकांतिकेच्या मार्गानेच जातात. या कादंबऱ्यांतील पुरुषपात्रे स्त्री पात्रांना काही न्याय देऊ शकत नाही. श्री. सदानंद देशमुख यांची 'चारीमेरा' ही कादंबरी परंपरा व नवता यांचे भान असणाऱ्या नायकाची कथा आहे. तो जीवनातील दुःखे, संकटे यांच्याकडे व्यवहार व विचार या दोन दृष्टीने पाहतो. त्यामुळे ही दुःखे व ही संकटे समशितोष्ण होतात.

गिरीजा कीर यांच्या कादंबऱ्या प्राय: विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील व एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील मध्यमवर्गाच्या भावजीवनाचा वेध घेतात. पारंपरिकता, आधुनिकता, कर्तव्याचे भान, सोशिकता, प्रगल्भता, परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे झेप, ही या कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रांची वैशिष्ट्ये आहेत. ही पात्रे दुःख सोसतात. दुःख सोसण्याची शक्ती संपली की आत्महत्या करतात.

'कापूसकाळ' ही कैलास दौंड यांची कादंबरी कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची परवड प्रभावी शब्दांत मांडते. यातून सामोरी येते ती शोषण करणाऱ्या समाजाची बेमूर्वतखोरवृत्ती. या कादंबरीत ग्रामजीवनातील एकमेकांना मदत करण्याची कौटुंबिकवृत्तीही दृग्गोचर होते.

'लोहारो वानरो देस' या डॉ. प्रल्हाद कुलकर्णी यांच्या कादंबरीत आदर्शवादाचा पराभव पाहावयास मिळतो. सुष्ट व दुष्ट शक्तीच्या लढाईत प्रश्न सोडवण्याच्या काही रीती समोर येतात. वाईट अर्थाने येथे राजकारणाचे प्राबल्य आहे. प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचाराचे दर्शन घडते आणि जाणवते की, एकविसावे शतक हे शापित शतक आहे.

श्री. सुरेंद्र पाटील यांची 'झुलीच्या खाली' ही कादंबरी श्रीशैल्य यांच्या परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या वृत्तीचा शेवटी कसा विजय होतो, हे मांडते. ममतेचा आर्त भाव हाच येथे सद्भाव ठरतो. श्रीशैल्यला हे यश मिळते ते भावात्मक दृष्टिकोन, आश्वासक जिद्द व अथक प्रयत्न यांमुळेच.

श्री. सुशील धसकटे यांची 'जोहार' ही कादंबरी ग्रामीण भागातील तरुणाची घुसमट मांडते. नागर संस्कृती आदर्श असावी असे ग्रामीण तरुणाला वाटते, पण ती संस्कृती किती भ्रष्ट आहे, हेच लक्षात येते.

मनोज बोरगांवकरांच्या 'नदीष्ट' कादंबरीत नदी आणि मानवी जीवन यांचे परस्परानुभव चित्रित केलेले आहेत. निवेदक, दादाराव, सकीनाबी, झिंगाभोई बामनवाड, तृतीयपंथी सगुणा, मालाडी, मीनासाब, कोकणातला भिकाजी ही पात्रे नदीच्या सहवासाने आपल्यातील सामाजिक बांधिलकी, माणुसकी जपतात. नदीच्या संदर्भातल्या लोककथा, जीवन समृद्ध करणारी निरीक्षणे 'नदीष्ट'चे मोठेपण स्पष्ट करतात.

'चैत' या द. तु. पाटील यांच्या कादंबरीत एका खेडेगावातील यात्रा भरण्यापासून यात्रा संपण्यापर्यंतच्या कालावधीचे चित्रण येते. ही कादंबरी ग्रामजीवनातील पारंपरिक मूल्ये व आधुनिक सुखवाद यांचे शब्दांकन करते. आतिथ्यशीलता, उदारता, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती ही वैशिष्ट्ये खेड्यात टिकली आहेत. तर मनोरंजनाच्या साधनांचा अतिरेक व व्यसनाधिनता यामुळे हे जीवन काळवंडले आहे. तशातच माहेरवाशिणीची स्वत: आनंदी राहून आई-वडिलांना आनंदी ठेवण्याची वृत्तीही दिसते. या सर्वांतून सूचकतेने चिंतनात्मकता प्रकट होते.

'पाऊसकाळ' या श्री. विजय जाधव यांच्या कादंबरीत महापुरामुळे गावाची कशी त्रेधातिरपीट उडते, याचे चित्रण येते. खेड्यामध्ये अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकऱ्याची सगळीकडून कोंडी होते. महापुरामुळे हातचे पीक जाते. शेतकऱ्यांची स्वप्ने भंग पावतात. सारे बदलते, पण अहंकार, हावरेपणा, स्वार्थीवृत्ती, भांडणाची खुमखुमी मात्र कायम राहते. प्राणिजीवनावर मानवाने केलेले आक्रमणही लेखकाने प्रभावीपणे मांडले आहे.

प्रा. आळवेकर यांनी या पंधरा लेखांतून त्या त्या कादंबरीकारांची नेमकी वैशिष्ट्ये जशी मांडली आहेत; तशीच १९८० नंतर बदललेल्या महाराष्ट्रीय भावविश्वाची लक्षणीय निरीक्षणेही नोंदवली आहेत. त्यांची समीक्षादृष्टी कादंबरीच्या भावविश्वातील नाट्य, ताणेबाणे अगदी सहजपणे साक्षात करते. त्यांच्या हातून कसदार समीक्षालेखन घडो, अशा शुभेच्छा देऊन मी माझ्या दोन शब्दांना पूर्णविराम देतो.

□

**– डॉ. पंडित टापरे**

# 'गावठाण'मधील कोल्हापुरी बोली

'गावठाण' (२००१) ही कृष्णात खोत यांची पहिलीच कादंबरी. 'आंदी' नावाच्या शेतकऱ्याच्या मुलीची ही कहाणी आहे. 'आंदी'च्या जीवनातील दारिद्र्य, व्यथा, वेदना मांडताना तिच्या आयुष्याचा झालेला खेळखंडोबा लेखकाने चित्रित केला आहे. कादंबरीत संपूर्ण निवेदन कोल्हापुरी बोलीभाषेत आहे. शेती, निसर्ग, गुरढोरं, घर यांच्याशी निगडित येणारे शब्द, वाक्प्रचार, रीतिरीवाज, समजुती, म्हणी, शिव्या या भाषीय संस्कृतीच्या अंगाने 'गावठाण' कादंबरीचा विचार करताना कोल्हापुरी भाषेचे वेगळेपण जाणून घेता येईल.

कोल्हापूर जिल्ह्यातील शेती, निसर्ग, काही संकेत, व्यवहार, घर, संस्कृती, भावभावना या संदर्भाने येणारे 'गावठाण' कादंबरीमधील काही शब्द पुढीलप्रमाणे - येरल, ऐदान, दत्ताळी, इळं, खळं, व्हळी, पैरकरी, पिंजराचा कवळा, उनाच किरव, तिवडा, लोढणा, कुंडाला, गुळभात, वळप, धांदूटी, वजवून, भांगलादुंगलाय, खांडकुळींच याल, पंद, चिक, गार, अर्धलीन, पाखाडी, आडदानी, वरखाद, धाळकांड, माँड, वरक्या, दूधभात, येबाव, रासारी, झळांबल, ईदमान, आवलगामी, इसान, ध्वाडनिन, कडानं, अप्रुबाई, भगटाय इत्यादी

वरील शब्दांपैकी काही शब्दांचे संदर्भाने येणारे अर्थ पुढे दिले आहेत.

१. येरल (पृ.१६) - पावसाळ्यात शेतीचे काम करताना पावसापासून संरक्षण करणारे बांबूच्या पातळ पट्ट्यापासून बनवलेले एक साधन.

२. ऐदान (पृ.१८) - टोक असलेले पोलादी लांब अवजार.

३. खळं (पृ.२२) - धान्य मळण्याची शेणामातीने सारवलेली गोलाकार जागा.

४. व्हळी (पृ.२२) - भाताच्या काडणाचा रेखीव पद्धतीने केलेला ढीग.

'दादा, इळं निसण्याव चोळीत हुतं' (पृ.२१)- या वाक्यातील 'इळं' म्हणजे विळे. भात कापण्यासाठी वापरण्याचे विळे तर 'निसणं' म्हणजे विळ्याला धार लावण्यासाठी वापरण्यात येणारा विशिष्ट दगड.

५. दत्ताळी (पृ.१८) - भांड अडकवण्याचा दोरीचा तयार केलेला फासा किंवा जाळी.